## संक्षिप्त

### स्वानंदी ज्ञान मंदिरचे आज भूमिपूजन

**नाशिक :** हरसूल येथील स्वानंदी क्रीडा व शिक्षण फाउंडेशन संचालित स्वानंदी ज्ञान मंदिर शाळेचे भूमिपूजन गुरुवारी सकाळी १० वाजता आमदार हिरामण खोसकर यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. हरसूलच्या बारीपाडा येथील नाचलोंढी रस्त्यावर हा कार्यक्रम होईल. कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन विश्वस्त संदीप बत्तासे यांनी केले आहे.

### जयरामभाई शाळेचा वार्षिक सोहळा

**नाशिक :** येथील गोखले एज्युकेशन सोसायटीच्या नाशिक रोड येथील जयरामभाई हायस्कूलचा वार्षिक क्रीडा महोत्सव व पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात झाला. अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. मंजुषा कुलकर्णी होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून क्रीडा शिक्षक हिरामण शिंदे, संस्थेच्या नाशिकरोड विभागाचे शाळा अधीक्षक योगेश महाजन, विद्यालयाचे माजी विद्यार्थी आणि सैन्यदलात कार्यरत विजयराव देठे , माजी मुख्याध्यापक अशोक रणमाळे, पालक शिक्षक संघाचे सदस्य कुलदीप भालेराव, मनीष गुंडगळ उपस्थित होते. क्रीडा शिक्षक अनिल लोखंडे यांनी प्रास्ताविक केले. मुख्याध्यापक जे. एन.आहेर यांनी स्वागत केले. डॉ. कुलकर्णी, देठे, शिंदे यांनी मार्गदर्शन केले. पारितोषिकप्राप्त विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. आभार तुषार खांडबहाले यांनी मानले.

### चुंचाळे शिवारातून गुटखा जप्त

**नाशिक :** अन्न व औषध प्रशासन नाशिक कार्यालयाच्यावतीने शहराजवळील चुंचाळे शिवारात छापा टाकून एक लाख ४७ हजार २८ रुपयांचा गुटखा जप्त केला. यातील काही नमुने अन्न व औषध प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवण्यात आले.

चुंचाळे शिवारातील भोर टाऊनशीप येथील सागर कोठावदे याच्या घरी अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने छापा टाकला. घरामध्ये हिरा पानमसाला, विमल पानमसाला, वाह पानसमाला आणि सुगंधित तंबाखू असा २६, १५८ रुपयांचा साठा आढळला. तसेच सतीश सोनजे याच्या घरात हिरा पानमसाला, रॉयल सुगंधित तंबाखू, राजनिवास सुगंधित पानमसाला, जाफरानी दर्जा, केशरयुक्त विमल असा एक लाख २०, ८७० इतका साठा जप्त करण्यात आला. अन्न सुरक्षा अधिकारी संदीप तोरणे यांनी १६ नमुने अन्न विश्लेषणासाठी पाठवण्यात आले. याबाबत अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अतिक्रमण, स्वच्छतेबाबत सूचना

## साधुग्राम नियोजित जागेची आयुक्तांकडून पाहणी

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**नाशिक :** आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर, महानगर पालिका आयुक्त मनिषा खत्री यांनी साधुग्राम परिसरासह कुंभमेळा प्रशासकीय इमारत, सिटीलिंक बस आगार आदींची पाहणी करून अतिक्रमण, अस्वच्छता हटविण्याची सूचना केली.

काही दिवसांपूर्वीच राज्याच्या मुख्य सचिवांनी सिंहस्थविषयक आढावा बैठक घेतली होती. सर्व विभागांना अंतिम आराखडा सादर करण्याची सूचना केली होती. साधुग्रामच्या जागेचा सिंहस्थाचा कालावधी वगळता कसा वापर करता येईल, यावर विचार करण्याची सूचना केली होती.

महापालिकेने या संदर्भात विविध संकल्पना व प्रस्ताव शहरवासीयांकडून मागवले आहेत. या पार्श्वभूमीवर, नवनियुक्त आयुक्त खत्री यांचा तपोवन परिसरात हा पहिलाच दौरा होता. पंचवटीतील विविध महत्त्वाच्या ठिकाणांची पाहणी करून त्यांनी सूचना दिल्या. बेघर निवारा केंद्र, बटुक हनुमान मंदिर आणि नियोजित साधूग्राम जागेची त्यांनी पाहणी केली. काही ठिकाणी अतिक्रमण आणि अस्वच्छता दृष्टीपथास पडल्यानंतर त्यांनी अतिक्रमण हटवण्यासह स्वच्छता करण्याच्या सूचना दिल्या.



### कामांच्या दर्जाकडे लक्ष देण्याची सूचना

आगामी सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेकडून कामांचे नियोजन करण्यात येत असून त्याअनुषंगाने सर्व विभागांनी आपआपल्या कार्यक्षेत्रातील कामांकडे लक्ष देण्याची सूचना आयुक्तांकडून करण्यात आली आहे. सिंहस्थासाठी येणाऱ्या साधु, महंतांच्या निवासासाठी साधुग्रामची व्यवस्था कशी असावी, यासाठी आयुक्त मनिषा खत्री यांनी साधुग्रामच्या नियोजित जागेची पाहणी केली. याशिवाय सिंहस्थाशी संबंधित इतर कामांना चालना देण्याची सूचनाही त्यांनी अधिकाऱ्यांना केली.

कुंभमेळ्यात लाखो भाविक दाखल होतील. कुंभमेळ्याच्या यशस्वीतेसाठी सर्व विभागांनी समन्वय साधत काम करण्याची गरज त्यांनी मांडली. पुढील काळात स्वच्छतेवर भर देत भाविकांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.

रामकुंड परिसरात स्मार्ट सिटी अंतर्गत सुरू असलेली कामे जलद पूर्ण करण्याचे सूचित करण्यात आले. भाविकांना कोणत्याही प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागू नये, यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे आयुक्त खत्री यांनी सांगितले. रामवाडी येथे गोदाकाठी विकसित झालेल्या उद्यानाची त्यांनी पाहणी केली. दौऱ्यात मनपाचे अधिकारी उपस्थित होते.

# गांजा तस्करांच्या मोटारीचा पोलिसांकडून थरारक पाठलाग

## संशयितास पोलीस कोठडी

लोकसत्ता प्रतिनिधी

**नाशिक :** गांजाची तस्करी करणाऱ्यांचा पाठलाग करून आडगाव पोलिसांनी २८ किलो गांजा जप्त करत एका संशयिताला ताब्यात घेतले. या कामगिरीबद्दल पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या हस्ते अधिकारी आणि अंमलदार यांना प्रशस्तीपत्र व रोख रक्कम देत गौरविले. संशयितास पोलिसांनी अटक करून न्यायालयात उपस्थित केले असता १० जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी दिली. एकूण १५ लाखांचा हा मुद्देमाल आहे.

नाशिक पोलीस आयुक्त कर्णिक यांच्या संकल्पनेतून गुन्हे प्रतिबंधासाठी थांबवा आणि शोधा (स्टॉप अँड सर्च) मोहीम राबवण्यात येत आहे. वाहने थांबवून अचानक तपासणी करण्यात येत आहे. आडगाव पोलीस ठाणे हद्दीत महामार्गावर मंगळवारी पहाटे अडीचच्या सुमारास नववा मैल येथे अंमलदार बाळकृष्ण पवार आणि हवालदार भाऊराव गांगुर्डे हे थांबवा आणि शोधा मोहिमेतंर्गत तपासणी करत असताना लाल रंगाची मोटार दोघांनी थांबवण्याचा प्रयत्न केला. मात्र चालकाने मोटार थेट त्यांच्या अंगावर घालण्याचा प्रयत्न केला.

हा पाठलाग रात्री लोकवस्ती असणाऱ्या परिसरात केला. पाठलाग करणाऱ्या पोलीस वाहनांची प्राथमिकता ही संशयित वाहन निर्मनुष्य वस्तीकडे घेऊन जाणे आणि मोटारीसह चालकास ताब्यात घेणे ही होती. त्यानुसार सर्व पोलीस वाहनांनी समन्वय साधत वाहन निर्मनुष्य वस्तीकडे नेण्यास भाग पाडले. या कालावधीत पाचपैकी चार संशयित घेत फरार झाले.

### संशयित वाहनाचा २५ किमी पाठलाग

दोघांनी मोटारीचा पाठलाग सुरू करत नियंत्रण कक्षाला माहिती दिली. त्यानंतर गुन्हे शाखेचे वाहन, आडगाव पोलीस ठाण्याचे वाहन कर्तव्यावरील पोलीस निरीक्षक, तपासणी कर्तव्यावरील पोलीस निरीक्षक, मुंबईनाका, भद्रकाली आणि पंचवटी या पोलीस ठाण्यांकडून अधिक कुमक मागवण्यात आली. आठ वाहनांनी मिळून संशयित वाहनाचा २५ किलोमीटर पाठलाग केला. नववा मैल ते द्वारका, द्वारका येथे वळण घेत अमृतधाम आणि अमृतधाम चौफुलीवर वळण घेत के. के. वाघ महाविद्यालय आणि महाविद्यालयाजवळ वळण घेत चक्रधर स्वामी मंदिरापर्यंत अशी तस्करांच्या मोटारीने पोलिसी वाहनांना हुलकावणी दिली. अखेर चक्रधर स्वामी मंदिराजवळ रस्ताच बंद झाल्याने संशयित पळून गेले. पोलिसांनी चालक आकाश डोळस (३६, रा. पनवेल) यास अटक केली.

---

**Hinduja Housing Finance Limited**

**कॉर्पोरेट कार्यालय :** नं. १६७-१६९, दुसरा मजला, अन्ना सलाय सैदापेट, चेन्नई-६०० ०१५ आणि
**शाखा कार्यालय :** शॉप नं. ७ व ८, पद्मविश्व रिजेन्सी, ४था मजला, जुने मानवता कॅन्सर हॉस्पिटलजवळ, सरोज ट्रॅव्हलच्या मागे, मुंबई नाका, नाशिक-४२२ ००३.

प्राधिकृत अधिकारी संपर्क क्र. :
(१) श्री. ऋषिकेश उभाळे - ९८२३२४४४९८, ई-मेल : rushikesh.ubhale@hindujahousingfinance.com
(२) श्री. हरिश काची - ८८३०९३८१९१,
(३) श्री. देवीदास घोटेकर - ९१५८१३८७९८, ई-मेल : devidas@hindujahousingfinance.com

**परिशिष्ट-IV [रुल ८(१) पाहा] ताबा सूचना (स्थावर मालमत्तेकरिता)**

ज्याअर्थी, **हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेडचे प्राधिकृत अधिकारी** असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटायझेशन अ‍ॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अ‍ॅसेट्स अ‍ॅण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, २००२ (उक्त अ‍ॅक्ट) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल ३ (उक्त रुल्स) यासह वाचलेल्या सेक्शन १३(१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत संबंधित सूचनांच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत संबंधित सूचनेमध्ये नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्याकरिता याखाली नमूद केलेल्या सविस्तर तपशिलानुसार संबंधित ऋणको व सह-ऋणकोंवर फर्माविणाऱ्या, उक्त अ‍ॅक्टच्या सेक्शन १३(२) अंतर्गत याखाली नमूद केलेल्या ऋणको व सह-ऋणकोंकरिता निर्गमित केल्या आहेत. संबंधित ऋणको/ मालमत्ताधारक संबंधित देय रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत. असे की, निम्नस्वाक्षरीकारांनी **०४.०१.२०२५** रोजी पंचनामा व यादी तयार करून संबंधित न्यायालय आयुक्तांच्या मदतीने माननीय मुख्य न्यायदंडाधिकारी नाशिक यांच्याद्वारा मंजूर झालेल्या सरफेसी अ‍ॅक्टच्या सेक्शन १४(१) अंतर्गत **क्रिमि. एम.ए. नं. १६१९/२०२३ मधील** दिनांकित **१९.०३.२०२४** आदेशानुसार सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेन्ट रुल्स. २००२च्या रुल ८ यासह वाचलेल्या सरफेसी अ‍ॅक्टच्या सब-सेक्शन (४) अंतर्गत त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजाणीत याखाली वर्णिलेल्या मालमत्तेचा वास्तविक/ प्रत्यक्ष ताबा घेतला आहे. विशेषकरून संबंधित ऋणको/ मालमत्ताधारकआणि आम जनतेस याद्वारा सावध करण्यात येते की, त्यांनी संबंधित मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि उक्त मालमत्तेबाबत केलेला कोणताही व्यवहार याखाली नमूद केलेल्या रकमेकरिता **हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**च्या आकाराच्या विषयाधीन असणार आहे.

| अ. क्र. | ऋणकोची नावे | मागणी सूचना तारीख व रक्कम | प्रत्यक्ष तब्याची तारीख | स्थावर सुरक्षित मत्तेचे वर्णन |
|---|---|---|---|---|
| १. | **लोन अकाऊन्ट नं. : MH/NSK/NASH/A000000278 आणि MH/NSK/NASH/A000000411 श्री. दीपक बापूराव पाठक (ऋणको), श्रीमती दिप्ती दीपक पाठक (सह-ऋणको), श्री. लक्ष्मीकांत बापूराव पाठक (सह-ऋणको)** दोघांचा निवासी पत्ता- फ्लॅट नं. १०४, 'तन्वी रेसिडेन्सी', धिकाले नगर, काळाराम मंदिर रोडजवळ, पंचवटी, नाशिक-४२२ ००१, महाराष्ट्र. | **२८.११.२०२२ रु. ४६,११,३११/-** (रुपये शेहेचाळीस लाख अकरा हजार तीनशे अकरा फक्त) **२३.११.२०२२** पर्यंत | **०४.०१.२०२५** | पुढील जमीन मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे- मंजूर झालेल्या लेआऊट प्लान धारण केलेला प्लॉट नं. ७ए यापैकी व त्यामधील जमीन मालमत्ता, मोजमापाची ७०० चौ.मी., सर्व्हे नं. १४३/१ए/१ए/ १+३/ १ ते ४/७ आणि सी.टी.एस नं. ५२८४ यापैकी व त्यामधील, येथे पडून असलेली, असलेली व स्थित असलेली- नाशिक, ता. व जि. नाशिक, नाशिक अर्बन अ‍ॅग्लोमेरेशनच्या मर्यादेत आणि नाशिक म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या मर्यादेत आणि नोंदणी व उप-नोंदणी जिल्हा नाशिकच्या मर्यादेत आणि पुढीलप्रमाणे सीमित: **पूर्व:** प्लॉट नं. ७ बीद्वारा, **पश्चिम:** श्रीराम शिल्प हाऊ. सोसायटीद्वारा, **दक्षिण:** ९ मी. कॉलनी रोडद्वारा, **उत्तर:** प्लॉट नं. ६ द्वारा. **अनुसूची-बी** पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे- बांधकाम केलेला फ्लॅट नं. १, अदमासे मोजमापाचा ९९० चौ.फू. म्हणजेच ९२.०० चौ.मी., बिल्ट-अप एरिया, स्टिल्ट फ्लोअरवर स्थित, आणि 'तन्वी रेसिडेन्सी अपार्टमेन्ट' यापैकी, जमीन मालमत्तेवर यथोचितरीत्या बांधकाम केलेला व **अनुसूची-ए** मध्ये अधिक तपशीलवारपणे वर्णिलेली आणि पुढीलप्रमाणे सीमित: **पूर्व:** फ्लॅट नं. २ द्वारा, **पश्चिम:** साइड मार्जिनद्वारा, **दक्षिण:** साइड मार्जिनद्वारा, **उत्तर:** प्लॉट नं. ४ द्वारा. |

याअधिक सूचना घ्यावी की, जर तुम्ही या सूचनेच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत सकारात्मकतेने **हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**च्या थकीत देणींचे प्रदान करण्यास असमर्थ ठरलात, तर **हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड** तुम्हास कोणतीही पुढील सूचना न देता वरील अ‍ॅक्ट/ रुल्सअंतर्गत तरतूद केल्यानुसार प्राधिकृत अधिकारी म्हणून असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांद्वारा निश्चित केलेल्या राखीव किमतीत सुरक्षित मत्तेच्या विक्रीची प्रक्रिया सुरू करण्यात येईल.

**दिनांक : ०४.०१.२०२५**
**स्थळ : नाशिक**

**स्वाक्षरी/-**
**प्राधिकृत अधिकारी,**
**हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**

---

**Hinduja Housing Finance Limited**

## हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

**कॉर्पोरेट कार्यालय** : १६७-१६९, दुसरा मजला, अन्ना सलाय, सैदापेट चैनई-६०० ०३२, तामिळनाडू.
**शाखा कार्यालय** : शॉप नं. ७ व ८, पद्मविश्वा रिजन्सी, ४था मजला, जुने मानवता कँसर हॉस्पिटलजवळ, नाशिक-४२२००२.
संपर्क क्र. : **श्री. ऋषिकेश उभाळे - ९८२३२४४४९८, श्री. हरिश काची - ८८३०९३८१९१, श्री. देवीदास घोटेकर - ९१५८१३८७९८.**

**मागणी सूचना - सेक्शन १३(२) अंतर्गत**

तुम्ही खाली नमूद केलेल्या ऋणकोंनी अनुसूचीत नमूद केलेली मालमत्ता गहाण ठेवून कर्ज सुविधेचा लाभ घेतला आहे आणि तुम्ही खाली नमूद केलेले कर्ज करारनाम्याकरिता ऋणको / सह-ऋणको / हमीदार म्हणून आहात. परिणामी, तुम्ही केलेल्या कसुरीमुळे तुमच्या कर्ज खात्याचे सिक्युरिटायझेशन अ‍ॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अ‍ॅसेट्स अ‍ॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, २००२ (संक्षिप्तात "सरफेसी अ‍ॅक्ट") च्या तरतुदीअंतर्गत "नॉन-परफॉर्मिंग अ‍ॅसेट" म्हणून वर्गीकरण करण्यात आले आहे. आम्ही "हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड"ने तुम्ही दिलेल्या पत्त्यावर सरफेसी अ‍ॅक्टच्या सेक्शन १३(३) यासह वाचलेल्या सेक्शन १३(२) अंतर्गत मागणी सूचना निर्गमित केली होती. रजिस्टर्ड पोस्टद्वारा तुम्हास पाठविलेल्या सूचना पोचवणी न होताच परत आल्या आहेत व पुन्हा स्वीकारल्या आहेत. उक्त सूचनांमधील समाविष्ट मजकूर असा आहे की, तुम्ही तुमच्याद्वारा हमी दिलेल्या विविध कर्जांचे प्रदान करण्यात कसूर दाखविली आहे. त्यामुळे, सरफेसी अ‍ॅक्टच्या सेक्शन १३(२)च्या तरतुदीनुसार सूचना देण्याकरिता आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट ) रुल्स, २००२च्या रुल ३(१)च्या तरतुदींच्या अनुसार सद्य प्रसिद्धी देण्यात आली आहे :

| अनु. क्र. | खाते, ऋणको व हमीदाराचे नाव व पत्ता / लोन अकाऊंट नंबर | सुरक्षित मतेचे वर्णन (स्थावर मालमत्ता) | एनपीएची तारीख | मागणी सूचना तारीख व रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | **श्री. बसीर अहमद शेख (ऋणको) व श्रीमती खलिकून निशा बसीर अहमद सिद्धीकी (सह-ऋणको) / MH/NSK/NASH/A000000340** | पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - रेसिडेंशियल युनिट धारण केलेला फ्लॅट नं. ०३, बिल्ट-अप एरिआ मोजमापाचा ७२० चौ.फू. म्हणजेच ६६.९१ चौ.मी. व फ्लॅट नं. ०४ बिल्ट-अप एरिआ मोजमापाचा ७२० चौ.फू. म्हणजेच ६६.९१ चौ.मी., "उदय प्लाझा को-ऑप. हाऊसिंग सोसायटी लि." म्हणून ज्ञात असलेल्या बिल्डिंगमधील पहिल्या मजल्यावरील, सीटीएस नं. ५४५८ एरिआ मोजमापाचा १२९०.१४ चौ.मी. यावर बांधकाम केलेला, नाशिक म्युनिसिपल कॉर्पोरेशन, नाशिकच्या मर्यादेत आणि विक्री विलेखानुसार पुढीलप्रमाणे सीमित : **पूर्वे**च्या दिशेने : सीटीएस नं. ५८५६, **पश्चिमे**च्या दिशेने : सीता गुंफा रोड, **उत्तरे**च्या दिशेने : श्री. विजय निकेतर यांची मालमत्ता, **दक्षिणे**च्या दिशेने : सीटीएस नं. ५४५८ए. | ०५.१२.२०२४ | **२१.१२.२०२४ - रु. ५९,५८,८६२/-** (रुपये एकोणसाठ लाख अठ्ठावन्न हजार आठशे बासष्ट फक्त) **२०.१२.२०२४ रोजीप्रमाणे** |
| २ | **श्री. कुंदन रवींद्र सिंह (ऋणको) व श्रीमती रितीका कुंदन सिंह (सह-ऋणको) / MH/NSK/NASH/A000000648** | पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - धारण केलेले रेसिडेंशियल युनिट / फ्लॅट नं. १० बिल्ट-अप एरिआ मोजमापाचा ४६.४६ चौ.मी., "सारा हाईट्स अपार्टमेंट" म्हणून ज्ञात असलेल्या बिल्डिंगमधील स्टिल्ट तिसऱ्या (चौथा) मजल्यावरील, प्लॉट नं. ५१ यावर बांधकाम केलेले, एकूण मोजमापाचा एरिआ ३०५.२५ चौ.मी., सर्व्हे नं. ५५/४ए यापैकी, सीटीएस नं. १६५० एरिआ मोजमापाचा ३०५.२५ चौ.मी. याशी तत्सम, सर्व्हे नं. ५५/४ए यापैकी व येथे स्थित - व्हिलेज चुंचले, ता. व जि. नाशिक, नाशिक म्युनिसिपल कॉर्पोरेशन, नाशिकच्या मर्यादेत आणि पुढीलप्रमाणे सीमित : **पूर्वे**च्या दिशेने : डक्ट व फ्लॅट नं. ११, **पश्चिमे**च्या दिशेने : मार्जिनल स्पेस, **उत्तरे**च्या दिशेने : मार्जिनल स्पेस, **दक्षिणे**च्या दिशेने : पॅसेज व स्टेअरकेस. | ०५.१२.२०२४ | **१८.१२.२०२४ - रु. ११,३४,७५३/-** (रुपये अकरा लाख चौतीस हजार सातशे त्रेपन्न फक्त) **१७.१२.२०२४ रोजीप्रमाणे** |
| ३ | **श्रीमती सोनाली अजित पाल (ऋणको), श्रीमती मीना अजित पाल व मनेश लहू माळी (सह-ऋणको) / MH/NSK/NASH/A000000735 & CO/CPC/CPCO/A000004350** | पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - धारण केलेला फ्लॅट नं. ०५, दुसऱ्या मजल्यावरील, मोजमापाचा बिल्ट-अप एरिआ ६९.४२ चौ.मी., बांधकाम केलेला मोजमापाचा एरिआ ७४७.०० चौ.फू., "अत्रिनंदन अपार्टमेंट" म्हणून ज्ञात असलेल्या बिल्डिंगमधील, पहिल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मालमत्तेवर बांधकाम केलेले, प्लॉट नं. १७ एरिआ २५६.२५ चौ.मी., सर्व्हे नं. २४/१/२/३/४/५/ए यापैकी, नाशिक म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या मर्यादेत व मौजे कामतवाडे, ता. नाशिक, जि. नाशिक येथे स्थित आणि जी पुढीलप्रमाणे सीमित आहे : **पूर्व** : ओपन स्पेस, **पश्चिम** : ओपन स्पेस, **दक्षिण** : फ्लॅट नं. ०६, **उत्तर** : साईड मार्जिन व कॉलनी रोड. | ०५.१२.२०२४ | **१९.१२.२०२४ - रु. २२,६४,१९६/-** (रुपये बावीस लाख चौसष्ट हजार एकशे शहाण्णव फक्त) **१७.१२.२०२४ रोजीप्रमाणे** |

तुम्हास याद्वारा व्याज व खर्च यासह पूर्वोक्त नमूद केलेल्या रकमेचे या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या कालावधीच्या आत "हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड"ला प्रदान करण्यास फर्माविण्यात आले आहे, त्यास असमर्थ ठरल्यास त्याकरिता "हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड" ऋणको, गहाणकार व हमीदारांच्या सुरक्षित मत्तेचा ताबा घेवून समाविष्ट सर्व किंवा कोणतेही एक किंवा अधिकतम सुरक्षित मत्तेच्या अनुसार उक्त अ‍ॅक्टच्या तरतुदीअंतर्गत आवश्यक कारवाई करील. उक्त अ‍ॅक्टअंतर्गत "हिंदूजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड"ला पुढील समाविष्ट अधिकार उपलब्ध आहे (१) सुरक्षित मत्ता सोडविण्याकरिता भाडेपट्टा, विक्रीचे अभिहस्तांकनाद्वारा हस्तांतरणाबाबत हक्क समाविष्ट ऋणको / हमीदारांच्या सुरक्षित मत्तेचा ताबा घेण्याचा अधिकार (२) "हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड"द्वारा सुरक्षित मत्तेबाबत कोणतेही हस्तांतरण आणि सुरक्षित मत्ता विकून वसुली करण्याचा आणि भाडेपट्टा, अभिहस्तांकन किंवा विक्रीद्वारा हस्तांतरणाकरिता हक्क समाविष्ट सुरक्षित मत्तेचे व्यवस्थापन हाती घेण्याचा व हस्तांतरित सुरक्षित मत्तेसंबंधित सर्व हक्क निहित आहेत.

उक्त अ‍ॅक्टच्या सेक्शन १३(१३)च्या तरतुदींच्या अनुसार, तुम्हास याद्वारा "हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड"च्या पूर्व-संमतीशिवाय "हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड"कडे तारणगहाण असलेल्या / गहाणवट असलेल्या आणि वर संदर्भित केल्यानुसार कोणतीही सुरक्षित मत्तेची विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य कोणत्याही तऱ्हेने (तुमच्या व्यवसायाच्या सामान्य रीतीखेरीज) हस्तांतरणाकरिता प्रतिबंधित करण्यात आले आहे.

**स्थळ : नाशिक**
**दिनांक : ०९.०१.२०२५**

**स्वाक्षरी/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**

---

FEDBANK

## फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड

**युनिट नं. ११०१, ११वा मजला, सिग्नस, प्लॉट नं. ७१ ए, पवई, पासपोली, मुंबई-४०००८७.**

**ताबा सूचना**

ज्याअर्थी, "फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लि."चे प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटायझेशन अ‍ॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अ‍ॅसेट्स अ‍ॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, २००२ (२००२चा ५४) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ३ यासह वाचलेल्या सेक्शन १३(१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत उक्त मागणी सूचनेच्या स्वीकृतीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत सर्व किंमत, आकार व आनुषंगिक खर्च, इ. अधिक संविदात्मक दरातील रकमेवरील पुढील व्याजासह एकत्रित **लोन अकाऊंट नं. FEDNSSSTL0484812 मधील रु. ८,९३,५०५/- (रुपये आठ लाख त्र्याण्णव हजार पाचशे पाच फक्त) व लोन अकाऊंट नं. FEDNSS0HL0492781 मधील रु. १३,०५,२३५.००/- (रुपये तेरा लाख पाच हजार दोनशे पस्तीस फक्त) म्हणजेच १६-१०-२०२४ रोजीप्रमाणे रु. २१,९८,७४०/- (रुपये एकवीस लाख अठ्ठ्याण्णव हजार सातशे चाळीस फक्त)** असलेल्या उक्त सूचनेमध्ये नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्याकरिता ऋणको, गहाणकार, सह-ऋणको व हमीदार :- **(१) महेश रमेश पिंगळे (ऋणको) (२) रमेश मोतीराम पिंगळे (ऋणको) (३) मंगल रमेश पिंगळे** यांच्यावर फर्माविणारी दिनांकित **२२ ऑक्टो., २०२४ मागणी सूचना** निर्गमित केली आहे.

ऋणको, गहाणकार, सह-ऋणको व हमीदार विनिर्दिष्ट कालावधीच्या आत पूर्वोक्त रकमेची परतफेड करण्यात असमर्थ ठरले आहेत, याद्वारा ऋणको, गहाणकार, सह-ऋणको व हमीदार तसेच आम जनतेस याद्वारा सूचना देण्यात आली आहे की, आज दिनांक **०७ जानेवारी, २०२५** रोजी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ८ यासह वाचलेल्या सरफेसी अ‍ॅक्टच्या सेक्शन १३(४) अंतर्गत त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत याखाली वर्णिलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे.

विशेषकरून यावरील नमूद केलेले ऋणको, गहाणकार, सह-ऋणको व हमीदार आणि आम जनतेस याद्वारा सावध करण्यात येते की, खालील मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि खालील मालमत्तेबाबत केलेला कोणताही व्यवहार सर्व किंमत, आकार व आनुषंगिक खर्च, इ. अधिक संविदात्मक दरातील रकमेवरील पुढील व्याजासह एकत्रित **लोन अकाऊंट नं. FEDNSSSTL0484812 मधील रु. ८,९३,५०५/- (रुपये आठ लाख त्र्याण्णव हजार पाचशे पाच फक्त) व लोन अकाऊंट नं. FEDNSS0HL0492781 मधील रु. १३,०५,२३५.००/- (रुपये तेरा लाख पाच हजार दोनशे पस्तीस फक्त) म्हणजेच १६-१०-२०२४ रोजीप्रमाणे रु. २१,९८,७४०/- (रुपये एकवीस लाख अठ्ठ्याण्णव हजार सातशे चाळीस फक्त)** या रकमेकरिता **"फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लि."**च्या आकाराच्या विषयाधीन असणार आहे.

सुरक्षित मत्तेच्या उपलब्ध वेळेत विमोचनाकरिता अ‍ॅक्टच्या सेक्शन १३ च्या सब-सेक्शन (८) च्या तरतुदींकडे ऋणकोचे लक्ष वेधीत आहोत.

**अनुसूची I**

**गहाण असलेल्या मालमत्तेचे वर्णन**

पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - रो हाऊस नं. २, एरिआ मोजमापाचा ३४.३८ चौ.मी. बिल्ट-अप + प्लॉट एरिआ मोजमापाचा ६७.२२ चौ.मी., "भोलेनाथ अपार्टमेंट" नावाच्या बिल्डिंगमधील, ज्याचे बांधकाम प्लॉट नं. २१, २२ यावर केलेले आहे, सर्व्हे नं. १००/ए यापैकी, मौजे चुंचले, जाधव संकूल, गणेश कॉलनी, दत्तानगर, सातपूर लिंक रोड, अंबाड, नाशिक-४२२०१०.

**सीमा पुढीलप्रमाणे :**
पूर्व :- कॉलनी रोड,
पश्चिम :- गट नं. १०३,
उत्तर :- रो हाऊस नं. ३,
दक्षिण :- रो हाऊस नं. १.

स्थळ : नाशिक
दिनांक : ०७/०१/२०२५

प्राधिकृत अधिकारी
फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लि.

---

pnb Housing Finance Limited Ghar Ki Baat

**परिशिष्ट-४-अ स्थावर मालमत्तेची ई-लिलाव विक्री सूचना**

सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२च्या नियम ८(६)च्या तरतुदींनुसार सहवाचता सिक्युरिटायजेशन अ‍ॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अ‍ॅसेट्स अ‍ॅण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

नोंदणीकृत कार्यालय : ९वा मजला, अंतरिक्ष भवन, २२ कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली-११० ००१, फोन : ०११-२३३५७१७१, २३३५७१७२, २३७०५४१४, वेब : www.pnbhousing.com

**नाशिक शाखा :** पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, २०१/२०२, दुसरा मजला, मेट्रो ९९ कमर्शियल कॉम्प्लेक्स, कॉलेज रोड, नाशिक, महाराष्ट्र-४२२ ००५

याद्वारे सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः कर्जदार आणि जामीनदारांना रकाना क्र. 'ए'मध्ये सूचित केलेली नोटीस देण्यात आली आहे की, खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्तेचे वर्णन रकाना क्र. 'डी'मध्ये गहाण/ सुरक्षित धनकोकडे केली आहे, मेसर्स पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने (रकाना क्र. 'सी'मध्ये वर्णन केल्याप्रमाणे) ज्याचा रचनात्मक/ भौतिकदृष्ट्या ताबा सुरक्षित धनकोंनी घेतला आहे, त्याची खाली नमूद केलेल्या तपशिलानुसार **''जसे आहे तिथे आहे, जे आहे तसे आहे''** आणि **''तेथे जे काही आहे या तत्त्वावर''** विक्री केली जाईल. तारखेनुसार सुधारित असलेल्या सिक्युरिटी इंटरेस्ट अंमलबजावणी नियम, २००२च्या नियम ८(६) आणि ९ अंतर्गत रकाना क्र. 'ए'मध्ये दर्शविलेल्या प्रकरणाप्रमाणे याद्वारे कर्जदार/ गहाण ठेवणारे/ कायदेशीर वारस, कायदेशीर प्रतिनिधी (ज्ञात किंवा अनोळखी), निष्पादक, प्रशासक, उत्तराधिकारी, संबंधित कर्जदार/ गहाणदार (मृत झाल्यापासून) यांना नोटीस देण्यात आली आहे.

विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तीसाठी कृपया मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड/ सुरक्षित धनकोच्या वेबसाइटवर प्रदान केलेल्या दुव्याचा संदर्भ घ्या म्हणजे **www.pnbhousing.com**.

| कर्ज क्र., कर्जदार/ सह-कर्जदार/ जामीनदार/ कायदेशीर वारस यांचे नाव (ए) | मागणी केलेली रक्कम आणि तारीख (बी) | ताब्यात घेण्याचे स्वरूप (सी) | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे वर्णन (डी) | आरक्षित किंमत (आरपी) (ई) | ईएमडी (आरपीच्या १०%) (एफ) | बोली सादर करण्याची अंतिम तारीख (जी) | बोलीवृद्धी दर (एच) | तपासणीची तारीख आणि वेळ (आय) | लिलावाची तारीख आणि वेळ (जे) | ज्ञात भार/ न्यायालयीन प्रकरणे असल्यास (के) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **एचओयू/एनएसके/१०१८/ ५९५६००, बी.ओ. : नाशिक, सुरज भागवत भांगरे/ लता भागवत भांगरे** | **रु. १४७४६०८.७१ दि. ३१.०३.२०२१ रोजीपर्यंत** | **भौतिकदृष्ट्या ताबा** | एकल इमारत, २रा मजला, १५, लक्ष्मी महल, सीटीएस क्र. ०४, अ.क्र. ९५/४ सेन्ट्रल बँकेच्या पुढे, पठाडे गल्ली, गंगापूर गाव, गंगापूर, गावठाण, शिवार, गंगापूर रोडसमोर, नाशिक, महाराष्ट्र-४२२ २२२. | **रु. १४८००००** | **रु. १४८०००** | **२३.०१.२०२५** | **रु. १०,०००** | **दि. १३.०१.२०२५ रोजी दु. १२.०० वा. ते ०४.०० वा.दरम्यान** | **दि. २४.०१.२०२५ रोजी दु. ०२.०० वा. ते ०३.०० वा.दरम्यान** | **माहीत नाही** |

*आनुषंगिक खर्च, खर्च, शुल्क इ. देय झाल्याच्या तारखेपर्यंत आणि/ किंवा त्याची प्राप्ती होईपर्यंत संबंधित पुढील व्याज @ १८% दरसाल लागू आहे. **पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या अधिकृत अधिकाऱ्याच्या सर्वोत्तम माहितीसाठी आणि माहितीनुसार, यावर नमूद केलेल्या स्थावर/ सुरक्षित मालमत्तेसंदर्भात इतर कोणतेही दायित्व/ दावे नाहीत, जे रकाना क्र. 'के'मध्ये उघड केले आहे. यशस्वी खरेदीदार/ बोलीदाराकडून त्याच्या/ तिच्या शेवटी पूर्ण केले जातील/ अदा केले जातील. संभाव्य खरेदीदार/ बोलीदारांना विनंती करण्यात आली आहे की, त्यांनी नमूद केलेल्या भारांची सत्यता स्वतंत्रपणे पडताळून पाहावी. **१.** आजपर्यंत पीएनबीएचएफएल/ पीएनबीएचएफएलच्या अधिकृत अधिकाऱ्याला वरील स्थावर मालमत्ता/ सुरक्षित मालमत्तेची विक्री, विल्हेवाट आणि/ किंवा विल्हेवाट लावण्यापासून प्रतिबंधित करणारा आणि/ किंवा न्यायालयाचा आदेश नाही. **२.** संभाव्य खरेदीदार/ बोलीवर आणि इच्छुक पक्ष स्वतंत्रपणे कार्यवाही/ ऑर्डर इ. जर असेल तर, रकाना क्र. 'के'मध्ये नमूद केलेल्या बाजूची तपासणी करू शकतात. पीएनबीएचएफएलकडे उपलब्ध असलेल्या शीर्षकाच्या दस्तऐवजांच्या शीर्षकासह; परंतु त्यापुरते मर्यादित नाही आणि निविदा/ बोली अर्ज सादर करण्यापूर्वी किंवा ऑफर देण्याआधी सर्व बाबतीत स्वतःचे समाधान करून घ्या. बोलीदाराने या लिलावाच्या अटी व शर्तीवर बोली फॉर्मसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. **३.** कृपया लक्षात घ्या की, सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२च्या नियम ९(३)नुसार बोली लावणारा/ खरेदीदार कायदेशीररीत्या विक्री किमतीच्या २५% रक्कम जमा करण्यास बांधील आहे (बयाणा रकमेसह, जर असेल तर, जमा) त्याच दिवशी किंवा पुढील कामकाजाच्या दिवसानंतर नाही. सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२च्या नियम ९(२)नुसार सुरक्षित धनकोकडून विक्री किमतीच्या २५% रक्कम मिळाल्यानंतरच विक्रीची पुष्टी बोलीदाराच्या नावे केली जाऊ शकते. विक्रीच्या मोबदल्याच्या उर्वरित ७५% रक्कम खरेदीदाराने विक्री पुष्टीकरण पत्राच्या पोचपावती तारखेपासून १५ दिवसांत जमा करणे आवश्यक आहे आणि अशा ठेवी न दिल्यास, मालमत्ता/ सुरक्षित मालमत्ता पुन्हा विकली जाईल. **४. सी१ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड** ई-लिलावाद्वारे विक्री आयोजित करण्यासाठी अधिकृत अधिकाऱ्याला मदत करेल, जिचे प्लॉट नं. ६८, ३रा मजला, सेक्टर ४४, गुडगाव, हरियाणा-१२२ ००३ येथे कॉर्पोरेट कार्यालय आहे. वेबसाइट- **www.bankeauctions.com**. मालमत्तेची तपासणी किंवा बोली कागदपत्र मिळविण्याशी संबंधित कोणत्याही सहाय्यासाठी आणि इतर कोणत्याही प्रश्नासाठी किंवा नोंदणीसाठी तुम्हाला **पंकज तिवारी/ अमोल माने,** संपर्क क्र. **१८०० १२० ८८००,** पीएनबीएचएफएलचे अधिकृत व्यक्ती यांच्याशी समन्वय साधावा लागेल किंवा **www.pnbhousing.com** ला पाहा.

**ठिकाण : नाशिक, दिनांक : ०९.०१.२०२५** **अधिकृत अधिकारी, मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**

---

पंजाब नैशनल बैंक (भारत सरकार का उपक्रम) pnb punjab national bank (Govt. of India Undertaking) Oriental United

**पंजाब नॅशनल बँक, "सर्कल शास्त्र नाशिक", शॉप नं. 2 आणि 3 मेझानाईन फ्लोअर, स्नेह हाईटस्, इंदिरा नगर, नाशिक - 422009**

## मागणी नोटीस

**कायदा कलम 13(2) मधील (सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अ‍ॅसेटस अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट 2002 अंतर्गत असलेल्या नियम 8 (1) मध्ये सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम 2002 अन्वये)**

ज्याअर्थी, खाली सही करणार **पंजाब नॅशनल बँक** चे अधिकृत अधिकारी, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीयल अ‍ॅसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट २००२ आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम २००२ च्या कलम १३ (२) नियम ३ नुसार प्राप्त झालेल्या अधिकारान्वये, संबंधित कर्जदार / जामीनदार/ तारणदार यांना खाली नमुद तारखेस मागणी नोटीस जारी करुन, खाली नमूद केलेल्या तपशीलानुसार भरणा करण्याची सूचना केली होती.

सदर नोटीस विविध कारणास्तव कर्जदार /जामीनदार / तारणदार यांना बजावता आली नाही. या नोटीशीची प्रत खाली सही करणार यांचेकडे उपलब्ध असून संबंधित कर्जदार यांनी इच्छा असल्यास कोणत्याही कामकाजाच्या दिवशी नेहमीच्या कार्यालयीन वेळेत, संबंधीत अधिकाऱ्यांकडून घ्यावी.

तरीही, संबंधित कर्जदार / जामिनदार / तारणदार यांना नोटीस देण्यात येते की, त्यांनी **पंजाब नॅशनल बँक** यांस ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ६० दिवसांचे आत पुढील नोटीशीत दाखवलेली रक्कम अधिक करारातील व्याजानुसार त्यापुढील भरणा करावयाच्या तारखेपर्यंतचे झालेले व होणारे व्याज आणि इतर खर्च यांचा भरणा करावा. कर्जदाराने घेतलेल्या कर्जापोटी सदर करार व कागदपत्रानुसार तारण म्हणून संबंधित मालमत्ता **पंजाब नॅशनल बँकेकडे** गहाण आहेत.

| कर्जदाराचे नाव व पत्ता व कर्ज खाते क्रमांक | खाते अकार्यक्षम झाल्याचा दिनांक (भारतीय रिझर्व बँकच्या मार्गदर्शना नुसार) | मागणी सूचनेचा दिनांक | चल/अचल मालमत्तेचे चतुःसिमेसह विवरण | कर्ज सुविधा | उर्वरीत रक्कम व्याजासह ३०.११.२०२४ एनपीए दिनांक पर्यंत | व्याज दिनांक ३१.११.२०२४ ते ०९.१२.२०२४ पासून | एकुण थकित रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **कर्जदार - श्री. सचिन किशोर जाधव श्री किशोर लक्ष्मण जाधव यांचा मुलगा** पत्ता १ - फ्लॅट नं. ११, वैष्णव विहार, बी-विंग, संसारीगाव, देवळाली, कॅम्प, नाशिक रोड, नाशिक, महाराष्ट्र - ४२२ ४०१ **पत्ता २ -** फ्लॅट नं. ६०३, ६वा मजला, रेणुका प्रसन्ना, सर्व्हे नं. ७२/४/२, विहितगाव, नाशिक, महाराष्ट्र - ४२२ ४०१ **खाते क्रमांक - 21866016000087 शाखा- महात्मानगर (484300)** | ३०.११.२०२४ | **दिनांक** १३.१२.२०२४ | गहाण असलेले रहिवाशी फ्लॅट नं. ६०३, क्षेत्रफळ ६६.२१ स्क्वे.मी. (कारपेट), रेणुका प्रसन्ना ईमारत, सर्व्हे नंबर ७२/४/२, एरिया क्षेत्रफळ १२३०.०० स्क्वे.मी., विहितगाव, ता.जि. नाशिक, महाराष्ट्र. **चतुःर्सिमा - पुर्व -** फ्लॅट नं. ६०२, **पश्चिम -** मार्जिनल स्पेस, **उत्तर -** मार्जिनल स्पेस, **दक्षिण -** फ्लॅट नं. ६०१ | टर्म लोन रु. १४,४८,५६७.७५ | १४,४८,५६७.७५ | रु. ३,४९२.०० | रु. १४,५२,०५९.७५ |
| **कर्जदार - श्री. संदिप रामचंद्र शिंदे श्री. रामचंद्र म्हसुजी शिंदे यांचा मुलगा** पत्ता १ - ३४३३, अंधारे मंडप जवळ, गणराज चौक, चावटा, जुने नाशिक, नाशिक , महाराष्ट्र- ४२२ ००१ **पत्ता २ -** फ्लॅट नं. ६०२, ६वा मजला, रेणुका प्रसन्ना, सर्व्हे नं. ७२/४/२, विहितगाव, नाशिक, महाराष्ट्र - ४२२ ४०१ **खाते क्रमांक - 21866016000063 शाखा- महात्मानगर (484300)** | ३०.११.२०२४ | **दिनांक** १३.१२.२०२४ | गहाण असलेले रहिवाशी फ्लॅट नं. ६०२, क्षेत्रफळ ६६.२१ स्क्वे.मी. (कारपेट), रेणुका प्रसन्ना ईमारत, सर्व्हे नंबर ७२/४/२, एरिया क्षेत्रफळ १२३०.०० स्क्वे.मी., विहितगाव, ता.जि. नाशिक, महाराष्ट्र. **चतुःर्सिमा - पुर्व -** मार्जिनल स्पेस, **पश्चिम -** फ्लॅट नं.६०१, लिफ्ट, **उत्तर -** फ्लॅट नं.६०३, **दक्षिण -** मार्जिनल स्पेस | टर्म लोन रु. ११,८१,४७३.५२ | ११,८१,४७३.५२ | रु. ३,१३३.०० | रु. ११,८४,६०६.५२ |

जर संबंधित कर्जदार / जामीनदार / तारणदार मागणी केल्यानुसार भरणा करु शकले नाही तर **पंजाब नॅशनल बँक** सदर कायदयातील कलम १३(४) आणि त्यांचे नियम यामधील तरतूदीनुसार वरील मालमत्तेमधून वसूलीची प्रक्रिया सुरु करेल. अशा प्रक्रियेमुळे होणारे परिणाम वा नुकसान यास कर्जदार / जामीनदार हेच सरफेसी कायदयानुसार जबाबदार असतील. **पंजाब नॅशनल बँकेच्या** पूर्व परवानगीशिवाय सदर मालमत्ता विकणे, कराराने देणे किंवा इतर कोणत्याही पध्दतीने व्यवहार करण्यास सरफेसी अ‍ॅक्टप्रमाणे कर्जदार यांना प्रतिबंध करण्यात येत आहे. कर्जदार/ जामीनदार यांनी सरफेसी कायदयामधील कोणत्याही तरतूदींचा भंग केल्यास सरफेसी कायदायप्रमाणे ते दंड / शिक्षेस पात्र होतील.

संबंधित कर्जदार / जामीनदार / तारणदार यांना कलम १३ च्या उपकलम (८) च्या नियमाप्रमाणे लक्ष वेधण्याकरीता कळविण्यात येत आहे

दिनांक : १३.१२.२०२४
ठिकाण : नाशिक

**स्वैर भाषांतर - तफावत आढळल्यास मूळ इंग्रजी मजकूर ग्राहय**

**स्वाक्षरी/-**
**श्री. विवेक बोधी**
**मुख्य व्यवस्थापक आणि अधिकृत अधिकारी**
**पंजाब नॅशनल बँक**